**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.३५/२०२३ नि.क्र.०५ वरील आदेश**
(अधिघोषीत दिनांक ०५ जुन, २०२४)
**अनुसया व इतर – वि.– रामेश्वर व इतर**
CNR No. MHLA060017302023

प्रस्तूत प्रकरण अर्जदारांनी कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५, कलम १२ अन्वये दाखल केले आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे :-**

**०२.** मुळ प्रकरणी अंतिम निकाल होणेस वेळ लागणार आहे. अर्जदारांचे कथन असे की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची कायदेशीर पत्नी आहे, अर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र. १ त्यांच्या विवाह संबंधातून जन्मलेले आहे. गैरअर्जदार क्र.२ व ५ हे अर्जदार क्र.१ चे सासु व सासरे आहेत व गैरअजदार क्र.४ व ५ भाया आहेत. अर्जदार क्र.१ हिचा विवाह गैरअर्जदार क्र.१ सोबत हिंदू जाती रुढी व रितीरिवाजाप्रमाणे दिनांक २३.०३.२०१४ रोजी मौजे चिखली, ता.अहमदपूर येथे झाला आहे. अर्जदार क्र.२ ते ४ हे त्यांचे अपत्य असून ते अज्ञान आहेत व त्यांचे पालनकर्ती अर्जदार क्र.१ ही आई कायदेशीर व नैसर्गीक पालनकर्ती आई आहे.

**०३.** लग्न झाल्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र. १ सोबत नांदण्यासाठी मौजे कोपनरवाडी, ता.अहमदपूर येथे गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांच्यासोबत एकत्र राहत होती. त्यादरम्यान गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस दारु पिऊन मारहाण करुन तु मला पसंद नाही म्हणून त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच माझे मी दारु सोडणार नाही असे म्हणून प्रत्येक दिवशी येवून तिला मारहाण करुन त्रास देत होता. तिने तिचे त्रास सहन करुन तेथेच नांदली व दिनांक ०४.०३.२०२३ रोजी तिला मारहाण करुन घराबाहेर हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही तिचे आई वडील व नातेवाईक यांनी गैरअर्जदारांना समजावून सांगिले परंतु परत गैरअर्जदार क्र.१ हा सतत तु मला पसंत नाही मला दुसरे लग्न करायचे आहे मला फारकत दे असे म्हणून मारहाण करत होता. तरी अर्जदार क्र.१ ही त्याचेसोबत चांगले संसार करु म्हणून समजावुन सांगण्याचा प्रयत्न करत राहिले. अर्जदार व गैरअर्जदार हे एकत्र राहत होते. त्या दरम्यान अर्जदार क्र.१ हीस गैरअर्जदाराने जाणुनबुजून दारु पिऊन पैशाची मागणी करत होते व त्रास देऊन उपाशीपोटी ठेवत होते. परंतु अर्जदार क्र.१ ही मुलांचा विचार

करुन तेथेच नांदत होती. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिचा शारिरीक व मानसिक छळ केला व मारहाण केली.

**०४.** दिनांक ०२/०५/२०२३ रोजी अर्जदार फॅमिली प्लॅनींग करीता माहेरी आली तेंव्हा गैरअर्जदाराने दुसरे लग्न केल्याचे समजले तेंव्हा अर्जदार ही नांदणेकरीता गेली असता गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारांना मारहाण केली तसेच बेरात्री त्यांना घराबाहेर काढून मला तुझ्यासोबत राहायचे नाही असे म्हणून मारहाण केली. तेंव्हा अर्जदार क्र.१ हिने त्याला समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला कांही फरक पडला नाही व तु घराबाहेर जा व भीक मागुन खा नाहीतर तुला सोडणार नाही असे म्हणून घराबाहेर हाकलुन दिले. अर्जदार क्र.१ हिचे आई वडिल मामा व इतर नातेवाईक गैरअर्जदाराकडे जाऊन अनेकवेळा त्यांना समजावुन सांगुन चांगले राहण्याची विनंती केली परंतु त्यांनी त्यांचे ऐकले नाही.

**०५.** अर्जदारांनी शेवटी दिनांक ०२.०५.२०२३ रोजी गैरअर्जदारांनी त्यांना घराबाहेर हाकलुन दिले तेंव्हा समजावुन सांगितले तेंव्हा चांगले वागतील असे वाटले परंतु गैरअर्जदार हे कधीही अर्जदारांची विचारपुस करणेकरीता आले नाहीत. तेंव्हा अर्जदार क्र.१ हिचे आई वडिलांनी गैरअर्जदारांना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु मला तुमच्या मुलीसोबत राहायचे नाही म्हणून तुम्हीच तुमची मुलगी सांभाळा असे म्हणून शिवीगाळ करुन घराबाहेर हाकलुन दिले. त्यानंतर दिनांक ०२.०५.२०२३ पासून अर्जदार हे अर्जदार क्र.१ च्या माहेरी राहत आहे.

**०६.** गैरअर्जदार हे अर्जदारांना त्रास देत आहे व त्यांना सांभाळत नाही, त्यांना जिवंत मारण्याची धमकी देत आहे. तसेच त्यांच्या खाण्यापिण्याची राहण्याची व्यवस्था करत नाही. अर्जदारांना कसल्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही व ते स्वत: उदरनिर्वाह करु शकत नाही. अर्जदार क्र.२ ते ४ हे अज्ञान आहेत. गैरअर्जदारांनी अर्जदारांना बेघर केले असून त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

**०७.** गैरअर्जदार हा मौजे धसवाडी येथे जमिन गट नं.४०४ मधील क्षेत्र ६० आर व ०१ हे. ०१ आर तसेच २० आर, गट नं.४४५ मधील क्षेत्र ६५ आर गट नं.४३१ मधील क्षेत्र ३२ आर ४०५ मधील क्षेत्र ९६ आर गट नं.४०७ मधील क्षेत्र १० आर या जमिनी अर्जदार व गैरअर्जदार यांचे एकत्र कुटूंबाचे वंशपरंपरेच्या वहिवाटी व मालकी कब्जेचे असून त्यातून त्यांना दरमहा पाच लाख रुपये येते व मौजे कोपनरवाडी येथे स्वत:चे घर आहे. शेतजमिन ही बागायती जमिन

गैरअर्जदारांना दरवर्षी वीस लाख रुपयाचे उत्पन्न होत आहे. गैरअर्जदार क्र.१ यास निव्वळ वार्षीक उपन्न २५,००,०००/- रुपये आहे म्हणून अर्जदारांना प्रत्येकी २५,०००/- रुपये पोटगी देवू शकतो व पोटगी देण्याची ऐपत बाळगुन आहे. सबब, अर्जदारांनी विनंती केली आहे की, अर्जदारांना अंतरिम पोटगी म्हणून प्रतिमहिना रुपये २०,०००/- व कोर्ट खर्च म्हणून १०,०००/- रुपये गैरअर्जदार क्र.१ कडुन प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत देणेबाबत आदेश व्हावा.

**गैरअर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे :-**

**०८.** गैरअर्जदार क्र.१, २, ४ व ५ यांनी प्रस्तुत अर्जास स्वतंत्र म्हणणे दाखल केले नाही. तथापी, निशाणी क्र.१० वर मुळ अर्जास म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराचे मुळ अर्जातील मजकुर नाकारला आहे. गैरअर्जदारांचे कथन असे आहे की, अर्जदारांनी दाखल केलेला अर्ज निव्वळ खोटा, काल्पनिक वस्तुस्थिती विरुध्द व मनघडत असून गैरअर्जदारांना परेशान करण्यासाठी दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिस नांदावयास आणण्यासाठी त्याचे आई वडिल, नातेवाईक काशीराम नारायण नरवटे, रमाकांत रुस्तुम कोपनर, सर्जेराव सखाराम कोपनर यांनी दिनांक १५.०४.२०२३ रोजी अर्जदार क्र.१ व तिच्या आई वडिलांकडे जाऊन प्रयत्न केला. परंतु त्यांनी गैरअर्जदार क्र.१ यास मारहाण करण्याची व हात पाय तोडुन खतम करण्याची धमकी दिली. परत दिनांक २४.०४.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ त्याचे नातेवाईक रुस्तुम माधव कोपनर, बंडु तुळशीराम पारेकर, नागनाथ बळीराम हुनगुंडे, शामराव दिंडे हे अर्जदारास आणण्यासाठी हासुळ ता.कंधार जि.नांदेड येथे गेले असता अर्जदार क्र.१, तिचे आई वडिल व भाऊ तानाजी आणि सुरेश यांनी संगणमत, कटकारस्थान करुन व वाईट शिवीगाळ करुन त्यांना परत पाठविले व जिवे मारण्याची धमकी दिली. गैरअर्जदार क्र.१, २, ४ व ५ यांनी असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला नांदवण्यास सदैव तयार आहे. परंतु अर्जदार हे गैरअर्जदारांकडे रहावयास व नांदावयास तयार नाही. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस दिनांक २७.०४.२०२३ रोजी व दिनांक ११.०५.२०२३ रोजी नांदावयास येण्याबाबत विनंती केली नोटीस पाठवले असून अर्जदार हिने त्या नोटीस स्वीकारल्या नाही व उत्तर दिले नाही. अर्जदार हे गैरअर्जदारांकडे राहावयास आले नाही. सबब, गैरअर्जदार क्र.१, २, ४ व ५ यांनी अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती

केली आहे.

**युक्तिवाद आणि मुद्दे :-**

**०९.** अर्जदार व गैरअर्जदार यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उभय पक्षकारांची विवादीत कथने व अभिलेखाचा विचार करता पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार क्र.१ याची पुरेशी ऐपत असताना देखील त्याने अर्जदारांचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केल्याचे, अर्जदार शाबीत करतात काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार क्र.१ ते ४ हे गैरअर्जदार क्र.१ याचेकडून दरमहा अंतरिम पोटगी मिळवीणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | अंशत: होकारार्थी, अर्जदार क्र.१ रू.३,००० व क्र.२ ते ४ प्रत्येकी रू.१,००० दरमहा |
| ३. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता :-**

**१०.** गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली ही बाब शाबीत करण्याची जबाबदारी अर्जदारांवर आहे. अर्जदारांनी कथन केले आहे की, दिनांक ०२.०५.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांच्या सोबत संगणमत करुन अर्जदार क्र.१ हिला 'तु मला पसंत नाही मला दुसरे लग्न करायचे आहे मला फारकत दे' असे म्हणून मारहाण करत होता व शिवीगाळ करुन जिवंत मारण्याची धमकी देऊन शारिरीक व मानसिक त्रास देत होता. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ सह तिच्या माहेरी गेली. याउलट, गैरअर्जदार क्र.१, २, ४ व ५ यांनी कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांकडे रहावयास व नांदावयास तयार नाही.

**११.** सामाजीक परिस्थिती व उपरोक्त विवादीत कथनांचा विचार करता, अर्जदार क्र.१ ही विवाहीत स्त्री संयुक्तीक कारणाशिवाय गैरअर्जदार क्र.१ याचा त्याग करून माहेरी राहत आहे, विशेष करून जेंव्हा तिला लहान मुले व मुली आहे, या कथनांवर विश्वास ठेवणे कठीण आहे.

**१२.** प्रस्तुतचा अर्ज दिनांक २२/०६/२०२३ रोजी दाखल केला असून आजपावेतो गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास निर्वाह भत्ता म्हणून काहीएक रक्कम दिली नसल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र.१ याचे सदरचे कृत्य हे आर्थिक दुर्व्यवहार असून सदरचे कृत्य कौटुंबिक हिंसाचार आहे. त्यामुळे सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचाराबाबत केलेल्या आरोपांमध्ये तथ्य आहे.

**१३.** अर्जदारांच्या वतीने विद्वान विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जदारांना उत्पन्नाचे साधन नाही व ते त्यांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहेत. अर्जदारांना खाणे पिणे, राहण्यासाठी अंतरिम पोटगी जरुरीची आहे. गैरअर्जदारांनी वैवाहीक नातेसंबंध कबूल केले आहे. अर्जदार व गैरअर्जदारांचे एकत्र कुटुंब असून कुटुंबाच्या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यावर गैरअर्जदार क्र.१ तसेच इतर सदस्यांच्या नावांच्या नोंदी आहेत.

**१४.** गैरअर्जदारांच्या वतीने विद्वान विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस नांदावयास आणण्यासाठी प्रयत्न केला परंतु अर्जदार ही गैरअर्जदारांकडे राहावयास व नांदावयास तयार नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर व्हावा.

**१५.** उभय पक्षकारांची विवादीत कथने व अभिलेखाचा विचार करता, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ हे उभयतांचे विवाह संबंधातून झालेले मुले व मुली आहेत ही बाब त्यांना मान्य आहे. अभिलेखावर अर्जदारांना उत्पन्नाचे साधन असले बाबत काहीएक पुरावा दाखल नाही. याउलट, अर्जदारांनी निशाणी क्र.०४ अन्वये दाखल केलेल्या मौजे धसवाडी, ता.अहमदपूर येथील भुमापन क्र.४०३ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर गैरअर्जदार क्र.१ याच्या नावाची नोंद असून सदर मिळकतीचे क्षेत्र केवळ ०१ हे. ०२ आर असून सदर मिळकत जिरायती आहे. त्या मिळकतीपासून गैरअर्जदार क्र.१ यास उत्पन्न मिळते ही बाब नाकारता येत नाही. म्हणून

गैरअर्जदार क्र.१ यास गैरअर्जदार क्र.१ याचे नावे मौजे धसवाडी, ता.अहमदपूर येथील भुमापन क्र.४०३ या वर्णनाची शेतजमीन असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्जदार यांचा सांभाळ करणे हे गैरअर्जदार क्र.१ याचे कायदेशीर कर्तव्य आहे. गैरअर्जदारांचे कथनानुसार अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांकडे रहावयास व नांदावयास तयार नाही व ती तिच्या माहेरीच राहत आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, गैरअर्जदार क्र.१ याची ऐपत असताना देखील त्याने अर्जदारांचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली आहे. सबब, मुद्या क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता :-</u>**

**१६.** अर्जदार क्र.१ ते ४ हे गैरअर्जदार क्र.१ याचे अनुक्रमे पत्नी व मुले असल्याने त्यांचा निर्वाह करण्याची कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ याची आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ४ हे गैरअर्जदार क्र.१ याचेकडून अंतरिम पोटगी मिळविणेस पात्र आहेत. अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन करता, मौजे धसवाडी, ता.अहमदपूर येथील भुमापन क्र.४०३ या मिळकतीचे ०१ हे. ०२ आर क्षेत्रास गैरअर्जदार क्र.१ याच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. अर्जदारांचे कथन असे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार हे हिंदु एकत्र कुटुंबाचे घटक आहेत. तथापी, गैरअर्जदारांनी अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यामुळे, प्रकरणाचे प्राथमिक स्थितीत पुराव्याशिवाय सदर विवादीत बाब विचाराधीन नाही. एकंदरीत, गैरअर्जदार क्र.१ याच्या नावे असलेल्या उपरोक्त मिळकतीचा विचार करता तसेच सध्याच्या महागाईचा विचार करता, अर्जदार क्र.१ ते ४ यांचे निर्वाहा करीता, अर्जदार क्र.१ करीता रक्कम रू.३,०००/- व अर्जदार क्र.२ ते ४ करीता प्रत्येकी रक्कम रू.१,०००/- दरमहा निश्चित करणे योग्य व न्यायाचे आहे. सबब, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता : -</u>**

**१७.** प्रकरणी उपरोक्त मुद्दे क्र.१ व २ यांचे उहापोह विचारात घेता, अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. तथापि, अभिलेखाचा तसेच उभयतांचे नातेसंबंध विचारात घेता, मी या मतास पोहोचले आहे की, प्रकरणाचे प्राथमिक स्थितीत कोणा एका पक्षकारावर खर्च बसवणे योग्य व न्यायाचे नाही. सबब, मी पुढील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

(१) अर्ज निशाणी क्र.०५ अंशत: मंजूर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदार क्र.१ यास आदेशीत करण्यात येते की, त्याने अंतरिम पोटगी म्हणून, अर्जदार क्र.१ हिस रू.३,०००/- व अर्जदार क्र.२, ३ व ४ यांना प्रत्येकी रू.१,०००/- दरमहा, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २२/०६/२०२३ पासून, प्रकरणाचा अंतिम निर्णय होई पर्यंत द्यावेत.

(३) या अर्जाचा खर्च अंतिम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषित केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KANCHANKAUR GADIWALE
Date: 2024.06.07 18:59:09 +0530

**(के.बी. गाडीवाले)**

दिनांक :- ०५/०६/२०२४.

सह प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्या.क्र.४) अहमदपूर, जि. लातूर.